श्रद्धांजली



मेहमूद: दिलदार माणूस, दमदार कलाकार

ज्यांची पडद्यावरची हजेरी मोठ्या मोठ्या हिरोंच्या मनातही न्यूनगंड निर्माण करत असे, अशा दमदार कॉमेडीयना ही इंडस्ट्री कायमची मुकलीय. या कलाकाराचं नाव आहे मेहमूद.

हिंदी चित्रपटसृष्टीतला नंबर एकचा कॉमेडीयन कोण?

या प्रश्नाच्या उत्तरादाखल दहापैकी सात जणं तरी मेहमूदचं नाव घेतील. इंडस्ट्रीत अनेक दशकं कॉमेडीयन म्हणून साम्राज्य प्रस्थापित करणारा हा विनोदवीर २३ जुलै रोजी आपल्यातून कायमसाठी निघून गेलाय.

इमोशन्स, ट्रॅजेडी आणि कॉमेडी असा तिहेरी संगम असलेल्या मेहमूदचा इंडस्ट्रीत प्रवेश झाला तो १९३२मध्ये. त्यांचे वडील मुमताज अली चित्रपटांमध्ये नर्तक म्हणून काम करत होते. त्यांच्या मद्याच्या व्यसनामुळे कुटूंबाच्या पालनपोषणाचा प्रश्न गंभीर होता. त्यामुळे नऊ-दहा वर्षांच्या मेहमूदला ट्रेनमध्ये छोट्या मोठ्या वस्तू विकाव्या लागत होत्या.

एकदा तर वडिलांवर रागावलेल्या लहानग्या मेहमूदने रेल्वे स्टेशनवर राहायचा निर्धार करून घर सोडलं. त्यांची आई मागोमाग धावत आली. वडिलांवर असं रागावणं चांगलं नाही हे तिने मुलाला परोपरीने समजावलं. पण मुलगा काही केल्या ऐकायला तयार नाही, हे पाहून आई रागाने म्हणाली, 'तुझ्या अंगावरचे कपडेही तुझ्या अब्बांनी दिलेले आहेत.' हे ऐकल्यावर मेहमूदने रेल्वे स्टेशनवर सगळ्यांच्या समोर अंगावरची वस्त्रंही उतरवण्याचा प्रयत्न केला होता म्हणे. दारूच्या नशेत वडील आईला मारहाण करत हे त्यांना सहन होत नसे. त्यांच्या मनावर याचा इतका खोलवर परिणाम झाला की, स्वतः मेहमूदनी आयुष्यात कधीच दारुच्या थेंबालाही स्पर्श केला नाही. नाहीतर या क्षेत्रात मद्याची चव न चाखलेला कलाकार क्वचितच सापडेल.

हास्यअभिनेत्याची लक्षणं त्यांच्यात लहानपणापासूनच होती. वडील चित्रपट क्षेत्राशी निगडीत असल्याने मेहमूदचाही या क्षेत्राशी जवळचा संबंध आला होता. वडील ज्या कंपनीत होते, त्या 'बॉम्बे टॉकिज'च्या सुपरहिट *किस्मत*मध्ये त्यांना अशोककुमारच्या बालपणीची भूमिका




आकाशदीप

साकारायची संधी मिळाली होती.

थोडे मोठे झाल्यावर अभिनेता बनण्याची तीव्र इच्छा मनात घर करू लागली. पण योग्य संधी मिळत नव्हती. मग मीनाकुमारीचे पती कमाल अमरोही यांनी त्याला फिल्मी चक्कर सोडून ड्रायव्हरची नोकरी करण्याचा सल्ला दिला. मेहमूदनेही त्यांचा सल्ला ऐकून ड्रायव्हिंग शिकून घेतलं. असंही त्यांना गाडीचं जबरदस्त वेड होतंच. (पुढे यशस्वी अभिनेता म्हणून नावारुपाला आल्यावर त्यांनी आठवड्यातल्या सात दिवसांसाठी सात वेगवेगळ्या रंगाच्या गाड्या घेतल्या होत्या.)



जीनी और जॉनी



खुद्दार

ड्रायव्हिंग शिकल्यानंतर राजकुमार संतोषींचे वडील प्यारेलाल संतोषी यांच्याकडे ते ड्रायव्हर म्हणून नोकरीला लागले. हळूहळू ड्रायव्हर, नोकर, असिस्टंट, अकाउंटन्ट अशा अनेक जबाबदाऱ्या ते मनापासून सांभाळू लागले. दरम्यान प्यारेलालजींची लाडकी अभिनेत्री रेहानाशी मेहमूदचं सूत जुळतंय अशी शंका येऊ लागल्यावर प्यारेलालनी त्यांना नोकरीतून कमी केलं.


आणि मग पुन्हा चित्रपटांत लहान-मोठ्या भूमिका मिळवण्याचे, काम शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले. दरम्यान मीनाकुमारीची बहीण मधूला ते बॅडमिंटन(काहींच्या मते टेबलटेनिस) शिकवण्याचं काम मिळालं. शिकवणी देता देता ते मधूच्या प्रेमात पडले आणि दोघांनी लग्न केलं. दुसरीकडे अभिनेता बनण्याची ओढही गप्प बसू देत नव्हती. *दो बिघा जमीन, सीआयडी* आणि *प्यासा*त त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या.

१९५८मध्ये *परवरीश*मध्ये राज कपूरच्या भावाची बऱ्यापैकी मोठी आणि महत्त्वाची भूमिका मिळाली. अर्थात, ती भूमिका कॉमिक नव्हती तर इमोशनल होती. त्यानंतर चित्रा, नाज आणि अमितासारख्या अनेक अभिनेत्रींबरोबर त्यांनी काम केलं. पण त्याचा त्यांच्या कारकीर्दीच्या दृष्टीने काही फायदा झाला नाही. १९६१मध्ये मेहमूदनी *छोटे नवाब* नावाचा एक चित्रपट स्वतःच बनवला. नायिका होती अमिता. आर. डी. बर्मन यांचा स्वतंत्र संगीतकार म्हणून तो पहिला सिनेमा होता.


हिरो म्हणून मेहमूदची जादू अजिबात चालली नाही, पण दाक्षिणात्य निर्मात्यांच्या चित्रपटांत विनोदी अभिनेता म्हणून त्यांना भलतीच मागणी होती. *छोटी बहन*(१९५९)पासून दाक्षिणात्य निर्मात्यांच्या चित्रपटांचा हा सिलसिला सुरू झाला. त्यानंतर *ससुराल, हमराही* आणि *जिंदगी* असे लागोपाठ चित्रपट आले. *ससुराल* तर पूर्णपणे इमोशनल चित्रपट असूनही मेहमूदच्या भूमिकेने त्यात जोरदार प्रतिसाद मिळवला.

याच सिनेमापासून शुभा खोटेबरोबर त्यांची जोडी जमली. त्यानंतर साठच्या दशकात या जोडीने *गृहस्थी, भरोसा, जिद्दी* आणि *लव्ह इन टोकियो*सारख्या चित्रपटांतून प्रेक्षकांचं भरपूर मनोरंजन केलं. हळूहळू चित्रपट क्षेत्रात मेहमूदच्या नावाचा दबदबा इतका वाढला की मेहमूदला चित्रपटात घेण्याबाबत, त्यांच्यावर एखादं तरी गाणं चित्रीत करण्याबाबत निर्माते आग्रही राहू लागले. राज कपूरची गाणी जशी मुकेशच्याच आवाजात रेकॉर्ड व्हायची, त्याप्रमाणे मेहमूदची गाणी मन्ना डे यांनी गायची असं समीकरणच झालं होतं. मात्र *गुमनाम*चं 'हम काले है तो क्या हुआ दिलवाले है...' हे गाणं रफीसाहेबांनी गायलं होतं.

मेहमूदजींबद्दल बोलतोय तेव्हा १९६६मध्ये प्रदर्शित झालेल्या *प्यार किये जा* आणि १९६८च्या *पडोसन* या दोन चित्रपटांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. *प्यार किये जा*मध्ये त्यांनी दिग्दर्शक बनण्यासाठी धडपडणाऱ्या मुलाची भूमिका साकारली होती, जो आपल्या चित्रपटासाठी वडिलांकडे(ओम प्रकाश) पैसे मिळवण्याचे नाना प्रयत्न



दो फूल



कुंवारा बाप



छाया: मौलिक कोटक





लकी अली आणि पकी अलीसह सावत्र आई ट्रेसी; चित्रलेखा-जी समूहाच्या एका कार्यक्रमात अरुणा इराणी आणि मेहमूद; किशोरकुमार, नवोदित राजेश रोशन आणि गायिका लता दीदींसह मेहमूद

करतो. एका भूतकथेवर चांगला चित्रपट बनवण्याची आपली कल्पना वडिलांकडे मांडताना तो वडिलांना ती कथा अशी काही ऐकवतो की, चित्रपटगृहातले प्रेक्षकही थरारून जात. आजही ते दृश्य आठवल्यावर अंगावर काटा उभा राहतो.

*पडोसन*मध्ये शेंडीवाल्या दाक्षिणात्य संगीतकार गुरूची त्यांनी साकारलेली भूमिकाही अविस्मरणीय ठरली. 'एक चतुर नार कर के सिंगार...' गाण्यात मेहमूद आणि किशोरकुमार यांची कॉमिक जुगलबंदी हिंदी चित्रपटांच्या इतिहासातलं अप्रतीम उदाहरण म्हणता येईल.

या दोन चित्रपटांबरोबरच *गुमनाम, पथ्थर के सनम, दो कलियां, नीलकमल, आंखें, औलाद* असे त्यांचे एकापाठोपाठ एक चित्रपट रिलीज होत होते, तसतशी मेहमूदची लोकप्रियता वाढत गेली. त्याबरोबर त्यांचा भावही चढत गेला. काही वेळा तर चित्रपटाच्या हिरोपेक्षाही कॉमेडीयनच्या भूमिकेसाठी मेहमूदला निर्माते अधिक पैसे मोजत असत.

हाती बऱ्यापैकी पैसा खेळू लागल्यावर मेहमूदनी अंधेरी पश्चिमेला एक ऐसपैस घर खरेदी केलं. त्यात त्यांचे अनेक जवळचे-दूरचे नातेवाईक येऊन राहू लागले. कमाल अमरोहींपासून वेगळी झालेली मीनाकुमारीनेही काही दिवस याच घरात आश्रय घेतला होता.

मेहमूद यांना श्रद्धांजली अर्पण करताना सुपरस्टार अमिताभनेही लिहीलेल्या लेखात अनेक आठवणी दिल्या आहेत. ते लिहीतात, 'मी जेव्हा या क्षेत्रात अगदीच नवा होतो तेव्हा मेहमूदसाहेबांनी मला आपल्या घरी एक स्वतंत्र खोली दिली होती. १९७० ते ७२ या काळात दीड वर्ष मी त्यांच्याकडेच राहात होतो.'

या कालावधीतच लोणावळ्यात त्यांच्या चित्रपटाचं शूटिंग बघायला आलेल्या ट्रेसी नावाच्या तरुणीच्या प्रेमात पडल्यावर मेहमूदनी तिच्याशीही विवाह केला. वैवाहिक जीवनात मधूप्रमाणेच ट्रेसीलाही पत्नीचा दर्जा देणाऱ्या मेहमूदची पडद्यावर शुभा खोटेप्रमाणेच अरुणा इराणीबरोबरही जोडी जमत होती. या जोडीचे *औलाद, गरम मसाला* आणि *नया जमाना* हे चित्रपट बेताचा व्यवसाय करणारे होते. आपल्या निर्मितीत बनवलेल्या *बॉम्बे टू गोवा*मध्ये मेहमूदनी अरुणा इराणीला अमिताभची नायिका म्हणून चमकवलं.

त्यानंतर मात्र काही कारणास्तव ही जोडी तुटली. असं म्हणतात की, आपल्यामुळे मेहमूदच्या वैवाहिक जीवनात कोणतीही कटूता निर्माण होऊ नये असा विचार करून अरुणा इराणी स्वतःहून त्यांच्या व्यावसायिक जीवनातूनही दूर झाली. अर्थात, त्यांच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली वाहताना अरुणाजी म्हणाल्या, 'ते माझे गुरू होते. मी त्यांच्याकडूनच अभिनय शिकले.'

अरुणा इराणी, अमिताभ बच्चन, आर.डी.बर्मन यांच्याप्रमाणे अनेक नवोदितांना संधी देणाऱ्या मेहमूद यांनी राजेश रोशनलाही संगीतकार म्हणून पहिली संधी दिली होती. विनोदाचा बादशहा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या दिलदार कलाकाराने अनेकांना यशाच्या शिखरापर्यंत पोहोचायला मदत केली होती. मात्र स्वतः यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतर त्यांना तिथे स्थिर राहणं हळूहळू कठीण वाटू लागलं. याचं कारण त्यांच्या पडद्यावरच्या हजेरीनेच नवोदित नायकांना वाटणारी असुरक्षितता. दुसरीकडे मेहमूदसाहेब स्वतःला नायक म्हणून चमकवण्यात अधिक रुची घेऊ लागले होते. त्यांचा अभिनय अधिक लाऊड होऊ लागला होता, हेही आणखी एक महत्त्वाचं कारण होतं. आपला पोलियोग्रस्त मुलगा पकी(मसूद)ला घेऊन बनवलेल्या *कुंवारा बाप*नंतर पुन्हा एकदा त्यांनी आपल्याच मुलांना घेऊन बनवलेला *जीनी और जॉनी* मात्र विशेष चालला नाही. नवे प्रस्ताव कमी झाले होते. अशा परिस्थितीत त्यांच्यासमोर चित्रपट संन्यास घेण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नव्हता. १९८०च्या दशकात अमिताभच्या *खुद्दार*मध्ये त्यांनी काम केलं. पण त्यात हा तारा विझत चालल्याचं प्रेक्षकांनाही जाणवलं.

त्यानंतर जवळपास पूर्णपणे निवृत्ती स्वीकारलेल्या मेहमूदनी बँगलोर इथल्या आपल्या फार्महाऊसवर शांत जीवन जगायला सुरुवात केली. आजारपणातल्या अखेरच्या दिवसांत पत्नी ट्रेसी आणि मुलगा मासूम त्यांच्या जवळ होते. मेहमूद यांची स्वतःची सात मुलं आणि एक दत्तक मुलगी मिळून एकूण आठ अपत्यं. पैकी पाचही मुलांची नावं 'म' या अद्याक्षराने सुरू होतात. मकसूद(गायक लकी अली), मसूद(पकी अली), मकदूम, मासूम आणि मंझूर.

आपल्या पश्चात एक विशाल कुटूंब आणि चाहत्यांचं अती विशाल जग सोडून गेलेल्या या महान हास्यसम्राटाला 'जी'चा मानाचा मुजरा! ✯